दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ४९ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२६ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

प्रजासत्ताक दिन निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# स्वत:घरात बसू पण दुसऱ्याला म्हणू रुसू बाई रुसू:एकनाथ शिंदेंचे ठाकरेंना प्रत्युत्तर

## अमित शहांच्या नखाचीही सर नसून वाघनखाची भाषा करतात

**जालना (वृत्तसंस्था)**

उद्धव ठाकरे यांनी रुसू बाई रुसू म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अंधेरीतील मेळाव्यात टीका केली होती. या टीकेला एकनाथ शिंदे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. स्वतः घरात बसायचे आणि दुसऱ्याला म्हणायचे रुसू बाई रुसू, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर जोरदार पलटवार केला. तसेच स्वतःला अमित शाह यांच्या नखाचीही सर नसूनही वाघनखे काढण्याची भाषा करतात, असे म्हणत अमित शहांवरील टीकेचा समाचार घेतला.

उपमुख्यमंत्री आज जालना दौऱ्यावर होते. आज त्यांची जालन्यात जाहीर सभा पडली. यावेळी ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख आसाराम बोराडे यांनी ठाकरे गटाचे शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसह काँग्रेसच्या आठ माजी नगरसेवकांनी देखील एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला आहे. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

काही जण पराभूत होऊनही सुधरत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह माझ्यावर टीका करतात. स्वतःला अमित शाह यांच्या नखाचीही सर नसूनही वाघनखे काढण्याची भाषा करतात. परवा माझ्यावर रुसू बाई रुसू म्हणत टीका केली म्हणजे स्वतः घरात बसायचे आणि दुसऱ्याला म्हणायचे रुसू बाई रुसू, असे म्हणत शिंदेंनी ठाकरेंच्या टीकेचा समाचार घेतला.तुम्ही ९७ जागा लढवल्या आणि २० निवडून आल्या. आम्ही ८० लढविल्या आणि ६० जागा निवडून आल्या, मग सांगा खरी शिवसेना कोणाची? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी यावेळी केला.

काही लोकांनी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधली होती. धनुष्यबाण यांनी गहाण ठेवला होता, असा आरोप करत बाळासाहेबांचे विचार आणि धनुष्यबाण पेलण्याची ताकद एकनाथ शिंदेंमध्ये आहे, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला. काही लोकांनी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधली होती, म्हणून २ वर्षांपूर्वी आम्ही उठव केला. आता हे रडायला लागले आहेत. नवनवीन आरोप करायला लागले आहेत, माझे हे चोरले ते चोरले. घरात बसून निवडणुका लढवता येत नाही, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.

तुम्ही लढा मी कपडे सांभाळतो असे नको. घरात बसून निवडणूक जिंकता येत नाही. एवढे शिवसैनिक का येत आहे. तिकडे मालक नी नोकर , मात्र इथे कुणी मालक नोकर नाही. इथे सर्व शिवसैनिक आहेत. अब राजा का बेटा राज नहीं बनेगा, मला सर्वांनी सांगितले श्रीकांतला मंत्री बनवा, मात्र आपण प्रतापराव जाधव यांना केंद्रात मंत्री बनवले, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

माझ्यातला कार्यकर्ता खुर्ची शोधत नाही, तर तो काम शोधतो, सतत कार्यरत राहणे हेच माझे ध्येय असून रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत सर्वसामान्य माणसासाठी काम करत राहणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. जालना येथील आझाद मैदानावर पार पडलेल्या विराट आशा आभार सभेला संबोधित करताना त्यांनी हे मत व्यक्त केले. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला भरभरून मतदान केल्याबद्दल त्यांनी जनतेचे जाहीर आभार मानले



# आयुध निर्माणी स्फोट: पालकमंत्री व कामगार मंत्र्यांचा घटनास्थळी दौरा;जखमींची विचारपूस

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जवाहर नगर येथील आयुध निर्माणीमध्ये २४ जानेवारीला घडलेली दुर्घटना ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना घडू नये यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात कामगार अधिनियम अन्वये कामगार हिताच्या दृष्टीने योग्य त्या सुरक्षा व्यवस्था देखील निर्माण असाव्यात, असे निर्देश पालकमंत्री संजय सावकारे व कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी २५ जानेवारीला आयुध निर्माणी प्रशासन व जिल्हा प्रशासनाला दिले.दुर्घटनेत मृत झालेल्यांच्या कुटुंबीयांप्रती पालकमंत्र्यांनी संवेदना व्यक्त केल्या.

पालकमंत्री संजय सावकारे आणि कामगार मंत्री यांनी कुटुंबीयांना मदतीचे आश्वासन दिले आहे.

यावेळी दोन्ही मंत्री महोदयांनी घटनास्थळाची पाहणी केली तसेच ही दुर्दैवी घटना होण्यामागे काय शक्यता असाव्यात याबाबत देखील आयुध निर्माणी व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. भविष्यात अश्या दुर्घटना टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश कामगार मंत्री फुंडकर यांनी दिले.

पाहणीत पालकमंत्री संजय सावकारे यांनी आयुध निर्माणीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी मृतांची संख्या, त्यांच्या कुटुंबीयांची स्थिती, तसेच जखमींवरील उपचारांविषयी विचारणा केली. याशिवाय, जखमींची भेट घेऊन त्यांच्यासोबत संवाद साधला आणि तातडीने उपचारांसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.



# विधानसभा निवडणुकीत वाढलेले मतदार मोदी सरकारने बांग्लादेशातून आणले होते का?–नाना पटोले

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भाजप सरकारच्या काळात मतदारांचे मतदानही सुरक्षित राहिलेले नाही. निवडणूक आयोगाने मतदार याद्यात मोठा घोटाळा केला आहे. निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेसाठी जाहिर केलेली मतदार संख्या ९.७० कोटी आहे तर मोदी सरकारच्या आरोग्य विभागाने महाराष्ट्रातील प्रौढ मतदारांची संख्या ९.५४ कोटी असल्याचे जाहीर केले आहे, निवडणूक आयोगाने ही वाढीव संख्या कोठून आणली? मतदानादिवशी संध्याकाळी जाहीर केलेली ५८ टक्के मतदान दुसऱ्या दिवशी ६६.५ टक्के कसे वाढले? लाडकी बहिण योजनेचा लाभ बांगलादेशींनी घेतल्याचे सरकार सांगत आहे, तसे विधानसभेला वाढलेले हे मतदार केंद्रातील भाजप सरकारने बांगलादेशातून आणले का? असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी विचारला आहे.

फडणवीस निवडणूक आयोगाची वकिली करत होते

लोकशाहीचे रक्षण व मतदारांची जागृती करण्यासाठी काँग्रेस पक्षाने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून राज्यभर आंदोलन करून पत्रकार परिषदा घेतल्या. नागपूर येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मतमोजणी वेळी एक-दोन मतदार वाढले तरी निवडणूक रद्द होते, पण विधानसभेला ६० लाख मतदार वाढले पण त्यावर निवडणूक आयोग काहीच उत्तर देत नाही. रात्रीच्या अंधारात ७६ लाख मते कशी वाढली, याचे उत्तर निवडणूक आयोगाने अजून दिलेले नाही. पण हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोगाची वकिली करत त्यावर स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. देवेंद्र फडणवीसांना ती स्क्रिप्ट नरेंद्र मोदी, अमित शाह, की निवडणूक आयोगाने दिली होती, असा सवाल नाना पटोले यांनी केला.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त श्री बालाजी विद्यालयात इसाद येथे आनंद नगरी उत्साहात



**गंगाखेड । प्रतिनिधी**

दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी, शुक्रवार, भारतीय प्रजासत्ताक दिन निमित्त श्री बालाजी विद्यालयात इसाद येथे आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले. या आनंद नगरीत ५ वी ते १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विविध प्रकारचे खाद्यपदार्थ विक्रीस ठेवण्यात आले होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी ग्राहक म्हणून आनंद नगरीचा मनमुराद आनंद लुटला. शाळेतील सर्व शिक्षक व मुख्याध्यापक व्ही. एम. पौळ यांनी देखील या आनंद नगरीत सहभाग घेतला. आनंद नगरिचे उद्घाटन इसाद ग्रामपंचायतीचे सरपंच अनिल सातपुते यांनी केले. यावेळी उपसरपंच ज्ञानोबा (माऊली) भोसले यांचाही उपस्थिती होती. अनिल सातपुते आणि माऊली भोसले यांनी या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या आनंद नगराचे कौतुक केले आणि त्यांच्याच बनवलेल्या पदार्थांचा आस्वाद घेतला.

# सातारा येथे चिमुरडीवर अत्याचार केल्याप्रकरणी एका आरोपीवर पोकसो अंतर्गत गुन्हा दाखल

**सातारा । किरण अडागळे**

सातारा शहर परिसरात अवघ्या साडे पाच वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार केल्याच्या प्रकरणी प्रविण श्रीरंग मोरे (वय ३०), राहणार मोरेवाडी, तालुका सातारा, याच्यावर शाहुपुरी पोलिस ठाण्यात पोकसो (झजउडज) कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सदर घटना १९ जानेवारी २०२५ रोजी घडली. चिमुरडी खेळत असताना संशयित प्रविण मोरेने तिला जवळून पाहिले आणि मुलगी एकटी असल्याचे पाहून तीला टावरवर घेऊन गेला. तिथे त्याने अत्याचार केला. मुलीने रडायला सुरूवात केली, त्यावेळी संशयिताने तिला धमकावत सांगितले की या घटनेची माहिती कोणाला देऊ नकोस. याशिवाय इतर वेळी देखील त्याने मुलीचा विनयभंग केला होता. घटनेनंतर मुलगी घाबरलेली होती. मुलीच्या आईने तिच्याशी बोलून घटनेची माहिती मिळवली. मुलीने आईला संपूर्ण घटना सांगितल्यानंतर, मुलीच्या आईने शाहुपुरी पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. पोलिसांनी त्यानुसार पोकसो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# महात्मा गांधी विद्यालयाचे पर्यवेक्षक रमेश भोसले यांना सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचा 'विज्ञान आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४' जाहीर

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुका एज्यूकेशन सोसायटी संचलीत महात्मा गांधी विद्यालयाचे पर्यवेक्षक रमेश मुरलीधर भोसले यांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी घेतलेले विशेष परिश्रम, विज्ञान विषयाची आवड निर्माण होण्यासाठी केलेले उत्कृष्ट कार्य यासाठी सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाने 'विज्ञान आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४' जाहीर केला आहे. सदर निवडीचे पत्र मंडळाचे अध्यक्ष श्री संजय जवंजाळ यांनी महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य बी.के. पाटील यांना पाठवले आहे. हा पुरस्कार सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाच्या १२व्या वार्षिक अधिवेशनामध्ये वितरीत केला जाणार आहे.

या जाहीर झालेल्या सन्मानाबाबत संस्थाध्यक्ष माजी आमदार जयवंतराव जगताप, विश्वस्त तथा नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, विश्वस्त युवा नेते शंभूराजे जगताप, प्राचार्य बी.के. पाटील, उपप्राचार्य अनिस बागवान,



पर्यवेक्षिका सुनिता नवले तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षेकतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

या सन्मानामुळे महात्मा गांधी विद्यालयाच्या लौकिकात आणखी भर पडली आहे.

# सराईत गुन्हेगारास अटक करून ७५००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त, सात घरफोडीचे गुन्हे उघडकीस

**सातारा । किरण अडागळे**

सातारा शहरातील रविवार पेठ येथील हॉटेलचे शटर उचकटून चोरी केल्याच्या प्रकरणी सातारा शहर पोलीसांनी एक सराईत गुन्हेगार संतोष रामचंद्र गावडे (वय ३०), राहणार बेंडवाडी, पोस्ट आसनगाव, तालुका सातारा, याला अटक केली आहे. त्यानंतर त्याच्याकडून अधिक चौकशी केली असता त्याने आणखी सात घरफोडींच्या गुन्ह्यांची कबूल करणे, तसेच पोलिसांना ७५००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करणे शक्य झाले.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका हॉटेलमधून मोबाईल व रोख रक्कम चोरीला गेल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर सातारा शहर पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने तपास सुरू केला. तपास दरम्यान, पोलिसांना संशयित आरोपींची रेकॉर्ड वरील माहिती मिळाली आणि त्यातून संतोष गावडे याला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत त्याने सात घरफोडींचा गुन्हा केल्याचे कबूल केले.

संतोष गावड्याने इतर ६ ठिकाणी देखील दुकानात चोरी केल्याचे सांगितले. याशिवाय त्याने सातारा शहर आणि शाहुपुरी हद्दीत आधी देखील चोरी केली असल्याचे कबूल केले. यामुळे त्याच्यावर १७ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी त्याच्या कडून चोरी केलेले दोन मोबाईल, चार हजार रुपये रोख रक्कम आणि एक दुचाकी असा एकूण ७५००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत सातारा शहर पोलिस निरीक्षक राजेंद्र म्हस्के, पोलिस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शाम काळे, फौजदार सुधीर मोरे, पोलिस निलेश यादव, सुजित भोसले, सुनील मोहीते, विक्रम माने, पंकज मोहीते, सचिन रिटे, संतोष घाडगे, इरफान मुलाणी, सागर गायकवाड, विशाल धुमाळ, मच्छिंद्रनाथ माने, सुशांत कदम, तुषार भोसले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# ३ फेब्रुवारीला सह्याद्री अतिथीगृहात रिटेवाडी उपसा सिंचन संदर्भात बैठक

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील रिटेवाडी उपसा सिंचन योजना कार्यवाहीला वाव देण्यासाठी ३ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली आहे.



शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, करमाळा तालुक्यातील नागरिकांनी या सिंचन योजनेला प्राधान्य देण्यासाठी एकमुखी मागणी केली होती. या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक महत्त्वाची बैठक घेतली होती. तसेच, यावर्षी ३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या बैठकीला तालुक्यातील सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले आहे.

शिवसेनेच्या प्रयत्नांमुळे रिटेवाडी उपसा सिंचन योजनेसाठी मिळालेल्या पाठिंब्यामुळे या योजनेची कार्यवाही लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे, अशी अपेक्षाही चिवटे यांनी व्यक्त केली.

# सुदृढ लोकशाहीसाठी मतदार महत्त्वाचा घटक-जिल्हाधिकारी विनय गौडा



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

१५ व्या राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमात जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी मतदारांच्या महत्त्वावर जोर दिला. ते म्हणाले, लोकशाहीसाठी प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपजिल्हाधिकारी अतुल जटाळे, आणि नवमतदारांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी नवमतदारांना ऑनलाईन नाव नोंदणीचे आवाहन केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी यांनी मतदार जागरूकतेचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमात मतदानाची शपथ घेण्यात आली, आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पर्यवेक्षक व बीएलओंचा जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सत्कार केला.

# आर.के.विद्यालयात नेताजी जयंती उत्साहात साजरी



**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव येथील रंगलाल केजडीवाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती आदरपूर्वक साजरी करण्यात आली. सुरुवातीला नेताजी आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य गणेश इंगळे, उपमुख्याध्यापक आनंद जीवने, उपप्राचार्य सुनील भोयर, पर्यवेक्षक माया वंडलकर, गणेश शर्मा, ज्येष्ठ शिक्षक अनिल पोटदुखे, सुबोध चचाने, अजय कोयाळ, रणजीत धोटे, हितेश पैकिने, संजय सुपे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनी याशिका खोरिया हिने नेताजींच्या जीवनावर आधारित अप्रतिम आत्मकथनात्मक भाषण केले. त्यात तिने देशाच्या प्रगतीसाठी त्याग आणि समर्पणाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन मंदा तरंगे आणि जया खराबे यांनी केले, तर आभार प्रदर्शन स्वाती कावडकर यांनी केले. यावेळी शाळेतील मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तिन्ही सांस्कृतिक विभाग, सुशील बांगर, सचिन नंदेश्वर, अमित उमरे, अभिजीत पाकमोडे, गजानन बहादूरकर, निलेश अलोने, प्रफुल पुण्यवंतवार आणि इतर सर्व शिक्षकांचे सहकार्य मिळाले

# शिरूर सातारा रोडवरील टोरंट सीएनजी पंपावर ग्राहकांच्या तक्रारीनंतर कंपनीने सुधारणा केली

**सोलापूर । प्रतिनिधी**

शिरूर सातारा रोडवरील आंधळगाव येथील टोरंट कंपनीचा सीएनजी पंप गेल्या काही महिन्यांपासून ग्राहकांच्या तक्रारींचा सामना करत होता. पंपावर नेहमी वर्दळ असलेला हा परिसर, नव्याने झालेल्या सिमेंट रस्त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने अधिक जड झाला आहे. यामुळे अपुरे रस्त्याचे बांधकाम, सूचक बोर्ड न लावले जाणे आणि कमकुवत रस्त्याच्या साईड पट्ट्यांमुळे अनेक वेळा अपघाताच्या घटना घडत होत्या.

याशिवाय, ग्राहकांच्या तक्रारींच्या परिणामी पंपाच्या शौचालयाची दुरुस्ती, शेड नसल्यामुळे उन्हात आणि पावसात थांबलेल्या ग्राहकांना होणारी अडचण यावर लक्ष देण्यात आले. अनेक ग्राहकांनी याबाबत पंपावर चोकीदार आणि फीलरच्या कडे तक्रार केली होती, परंतु त्यावर काहीही कार्यवाही होत नव्हती.

१८ जानेवारी २०२५ रोजी हा मुद्दा 'सह्याद्री राखणदार' यांच्या प्रतिनिधींकडे पोहोचला आणि त्यानंतर बातमी प्रसारित केली गेली. याचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून, कंपनीने मुरूम टाकून रस्ता



सुधारला, शौचालय दुरुस्त केले आणि इतर कामे सुरू केली आहेत.

सध्या, ग्राहकांची मुख्य मागणी म्हणजे पंपावर शेड उभारणे, ज्यामुळे पावसात आणि उन्हात ग्राहकांना आरामदायक परिस्थिती मिळेल. या सुधारणांमुळे ग्राहक वर्ग खूपच खुश आहे आणि त्यांनी कंपनीचे आभार मानले आहेत.

# ज्ञानेश्वर प्रल्हाद पगार यांना आदर्श प्रगतशील शेतकरी व ग्रामपंचायत केंद्र चालक पुरस्काराने गौरव

**वैजापूर । अर्जुन शिंदे**



वैजापूर तालुक्यातील गोळवाडी गावातील प्रगतशील युवा शेतकरी आणि ग्रामपंचायत संगणक केंद्र चालक ज्ञानेश्वर प्रल्हाद पगार यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी आदर्श प्रगतशील शेतकरी व ग्रामपंचायत केंद्र चालक म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. ज्ञानेश्वर पगार यांनी शेतीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करत एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या शेतात ड्रिप सिंचन पद्धतीचा वापर केला जातो. पावसाळ्यात बांधलेल्या शेततळ्यात पाणी साठवून ते फेब्रुवारी-मार्च महिन्यातील पाण्याच्या तुटवड्यात शेतातील पिकांसाठी वापरतात. त्यांच्याकडे शेतीसाठी आवश्यक सर्व यंत्रसामग्री असून, ते इतर शेतकऱ्यांना सल्ला आणि साहित्याची मदतही करतात. याशिवाय, ज्ञानेश्वर पगार गोळवाडी ग्रामपंचायतीत संगणक केंद्र चालक म्हणूनही काम करतात. ग्रामपंचायतीच्या योजना आणि माहिती प्रत्येक घरोघरी पोहोचवून त्यांनी ग्रामस्थांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. त्यांच्या या दुहेरी योगदानामुळे ते पंचक्रोशीत एक आदर्श युवा म्हणून ओळखले जातात. गावकऱ्यांनी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी त्यांच्या या कार्याचा गौरव करत त्यांचे अभिनंदन केले आहे. ज्ञानेश्वर पगार यांचे कार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आमदार विठ्ठलराव लंघे यांचा सत्कार

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नेवासा येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेनेचा शिवोत्सव मुंबई येथील बीकेसी मैदानावर राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थित मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी नुकत्याच झालेल्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या शिवसेनेच्या उमेदवाराला राज्यातील जनतेने भरघोस मतांच्या रूपाने आशिर्वाद दिला या विजयी उमेदवारांचा सत्कार राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित शिवसैनिकांसमोर केला.




यावेळी झालेल्या सत्कार समारंभात स्वतंत्र नेवासा विधानसभा मतदार संघाचे शिवसेनेचे उमेदवार विठ्ठलराव लंघे - पाटील यांचा सत्कार उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी केला याप्रसंगी शिवसेनेच्या जेष्ठनेत्या विधानसभेच्या उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे,शिवसेनानेते रामदास कदम,आमदार संतोष बांगर,गजानन किर्तीकर,प्रताप सरनाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आमदार विठ्ठलराव लंघे म्हणाले की,मागील अडीच वर्षांच्या कार्यकाळात शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राच्या विकासाला गती दिली. याचीच पोचपावती म्हणून जनतेने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिवसेना आणि महायुतीला भरघोस मतांच्या रूपाने आशिर्वाद दिलेला आहे. राज्यात महायुतीचा महाविजय झाला हा विजय आपणा सर्वांसाठी दैदिप्यमान असल्याचे गौरोद्गारही यावेळी आमदार लंघे यांनी बोलतांना काढले.

याच विजयाचा शिवोत्सव स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून मुंबईतील बीकेसी मैदानावर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आलेला आहे. या शिवोत्सवात माझ्यासह शिवसेनेच्या सर्व विजयी शिलेदारांचा सत्कार करण्यात आला. हा ऐतिहासिक क्षण माझ्यासाठी जीवनभर लक्षात राहणारा आहे असेही यावेळी लंघे म्हणाले. ज्या जनतेच्या आशिर्वादाने हा बहुमान मला मिळाला त्या नेवासकर जनतेचा मी शतश: आभारी आहे या ऐतिहासिक विजयी उत्सवाचा साक्षीदार होण्याची संधी मला मिळाली त्यासाठी मी स्वत:लाच भाग्यवान समजतो असे गौरोद्गारही यावेळी त्यांनी काढले.

# ठाकरे शिवसेनेचा पदाधिकारी मेळावा: जिल्हा परिषद निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्धार

**ठाणे । रविंद्र धारवणे**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रणनीती ठरवण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शहापूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा धर्मवीर आनंद दिघे सभागृहात संपन्न झाला.

या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांनी निवडणुका स्वबळावर लढवण्याची ठाम मागणी केली. यावर पक्षाचे उपनेते विश्वास थळे यांनी सर्व जागा स्वबळावर लढवण्याची तयारी करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात भिवंडी लोकसभा संपर्क प्रमुख साईनाथ तारे, उपजिल्हा प्रमुख शंकर खाडे, विद्यार्थी सेनेचे प्रवीण पाटील यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.



यावेळी व्यासपीठावर महिला जिल्हा संघटक रश्मी निमसे, भिवंडी लोकसभा सहसंपर्क प्रमुख सोन्या पाटील, ज्येष्ठ नेते रमेश जगे, तालुका महिला संघटक गुलाब भेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

मेळाव्याचे प्रास्ताविक तालुका प्रमुख कुलदीप धानके यांनी केले, तर सूत्रसंचालन सचिव रवींद्र लकडे यांनी पार पाडले. मेळाव्यादरम्यान सर्व पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकांमध्ये पक्षाच्या ताकदीचा प्रत्यय देण्याचा निर्धार व्यक्त केला

# युवतीची गळफास घेऊन आत्महत्या शंकरपूर येथे हृदयद्रावक घटना

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथे स्वाती सुनील चौधरी (वय १९) या युवतीने २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास गळफास लावून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. स्वातीने आपल्या खोलीचे दार बंद करून ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला. सकाळी तिचे कुटुंबीय कामात व्यस्त असताना काही वेळाने आजोबा तिला उठवण्यासाठी गेले. खोली आतून बंद असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी खिडकीतून पाहिले असता स्वाती गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसली. हा प्रसंग पाहून त्यांनी आरडाओरड केली, ज्यामुळे शेजारी धावून आले. स्थानिकांनी खोलीचे दार तोडून तिला खाली उतरवले आणि शंकरपूर पोलीस चौकीला याची माहिती दिली. घटनेची नोंद करून पोलिसांनी प्रेत उत्तरीय तपासणीसाठी चिमूर तालुका ग्रामीण रुग्णालयात पाठवले आहे. आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असून, पोलीस अधिक चौकशी करत आहेत. भिशी पोलीस स्टेशनचे ठाणेदार चांदे यांच्या मार्गदर्शनाखाली शंकरपूर पोलीस चौकीचे पोलीस निरीक्षक वाघ, पोलीस हवालदार नन्नावरे, शिपाई नागरगोजे आणि शिपाई गोडमारे तपास करत आहेत. ही हृदयद्रावक घटना गावात शोककळा पसरवणारी ठरली आहे

# भंडारा आयुध निर्माणीत भीषण स्फोट:८ जणांचा मृत्यू, ५ जखमी

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा जिल्ह्यातील जवाहरनगर येथील आयुध निर्माणी विभागात आज (२४ जानेवारी) सकाळी सुमारे १० वाजता झलेल्या भीषण स्फोटामुळे ८ जण मृत्युमुखी पडले असून ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. स्फोटामुळे छत कोसळून अनेक कर्मचारी मलब्यात अडकले. घटनास्थळी नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दिलीप भुजबळ, जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते, पोलीस अधीक्षक नुरुल हसन, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अभिषेक नामदास आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारी दाखल झाले.

आयुध निर्माणीचे अधिकारी, डऊछक, छऊछक, पोलीस विभाग, व भंडारा नगर परिषद यांच्या समन्वयाने मदत कार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. नागपूर महापालिकेची व स्थानिक अग्नीशमन





यंत्रणा घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. जखमींना तत्काळ रुग्णवाहिकेमार्फत लक्ष्य हॉस्पिटल व जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मुख्यमंत्री आणि आमदारांचा हस्तक्षेप

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेची माहिती घेत मदतकार्य वेगाने राबवण्याचे निर्देश दिले. भंडारा-तुमसरचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि लापरवाही टाळण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या.या स्फोटात चंद्रशेखर गोस्वामी (५९), मनोज मेश्राम (५५), अजय नागदेवे (५१),अंकित बारई (२०),लक्ष्मण केलवडे (३८),अभिषेक चौरसिया (३५),धर्मा रंगारी (३५) हे मृत पावले असून एन. पी. वंजारी (५५),संजय राऊत (५१),राजेश बडवाईक (३३),सुनील कुमार यादव (२४),जयदीप बनर्जी (४२) हे जखमी झाले आहेत. या स्फोटाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी चौकशी सुरू असून संबंधित अधिकाऱ्यांनी निष्कर्ष लवकरच जाहीर करण्याचे आश्वासन दिले आहे. आयुध निर्माणीतील या दुर्घटनेमुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. प्रशासनाने नागरिकांना शांतता व संयम राखण्याचे आवाहन केले आहे.

# तारकपूर बस स्थानक येथील खाद्य विक्रेत्यांच्या प्रश्न संदर्भात खा. निलेश लंके यांनी काढला तोडगा

## खाद्य विक्रेत्यांवर एसटी महामंडळ प्रशासनाच्या वतीने घातली होती बंदी



**पारनेर । प्रतिनिधी**

तारकपूर बस स्थानकावर अनेक वर्षापासून काही खाद्य विक्रेते हातावर व्यवसाय करत होते. मात्र तारकपूर बस स्थानक प्रशासनाच्या वतीने त्यांच्यावर अचानकपणे बंदी घातल्यामुळे ४० कुटुंबांचा उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला होता, या प्रश्नासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी तारकपूर बस स्थानक येथे भेट देत खाद्य विक्रेते व प्रशासन यांची बैठक घेत चर्चा घडून आणली, सकारात्मक चर्चेनंतर प्रत्येक खाद्यविक्रेत्याला लायसन देण्याच्या सूचना केल्या त्यानुसार आता खाद्य विक्रेत्यांना लायसन मिळणार असून आता खाद्य विक्रेते बस स्थानकावर हातावर फिरवून पुन्हा व्यवसाय करतील. खाद्यविक्रेत्यांच्या प्रश्नासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी तोडगा काढल्यामुळे खाद्य विक्रेते यांनी खासदार निलेश लंके यांचे आभार मानले यावेळी आगार प्रमुख अभिजित चौधरी, तारकपूर बस स्थानक प्रमुख अविनाश कलापुरे, माजी नगरसेवक भैय्या परदेशी, गणेश साठे, संदीप शिंदे यांच्यासह खाद्यविक्रेते आदी उपस्थित होते

# ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी पुण्यातील इंजिनिअरची उदार मदत



**सोलापूर । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पुण्यातील नामांकित आयटी कंपनीत उच्च पदावर कार्यरत सॉफ्टवेअर इंजिनिअर विष्णू हरिदास ननवरे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नीळवस्ती येथे दोन संगणक टेबल भेट दिले.

ग्रामीण भागातील शिक्षणाची जाणीव आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होणारा उपयोग लक्षात घेऊन ननवरे यांनी ही मदत केली. स्वतः ग्रामीण भागात शिक्षण घेतलेल्या ननवरे यांनी विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्राचे ज्ञान मिळावे आणि त्यांच्या विकासाला गती मिळावी, यासाठी हा पुढाकार घेतला आहे.

या योगदानाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक तात्यासाहेब जाधव, शिक्षक मनोज दराडे, आणि ग्रामस्थ निमगाव यांनी ननवरे यांचे आभार मानले. शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्या या मदतीचे कौतुक करताना विद्यार्थ्यांसाठी याचा उपयोग महत्त्वाचा ठरेल, असे नमूद केले.

या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची ओळख आणि शिकण्याची नवीन दृष्टी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# २६.जानेवारी,रोजी मौदा येथे परमात्मा एक सेवक यात्रा

## भंडारा, साकोली, तुमसर बसस्थानक येथून विशेष गाडया

**भंडारा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा द्वारे परमात्मा एक सेवक यात्रा २०२५ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत सन २०२५ मध्ये २६.जानेवारी, २०२५ रोजी मौदा येथे होणाऱ्या परमात्मा एक सेवक यात्रेकरीता भंडारा जिल्हातील भंडारा बसस्थानक, साकोली बसस्थानक, तुमसर बसस्थानक व पवनी बसस्थानक येथून भाविक भक्तांकरीता विशेष गाडया सोडण्यात येत आहेत .तसेच विभागामार्फत चालविण्यात येत असलेले सर्व लांब व मध्यम लांब पल्ला नियते व शिवशाही व निमआराम वाहनास मौदा यात्रा कालावधीत मौदा बायपास येथे थांबा देण्यात आलेला आहे.

तरी जिल्हातील सर्व भाविक भक्तांनी यात्रा कालावधीत राज्य परिवहन बसेसचा लाभ घ्यावा,असे आवाहन नियंत्रक, राज्य परिवहन भंडारा विभागानी कळविले आहे.

# दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**भंडारा । प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करून देण्याबाबतची योजना महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी पोर्टल *हीींिि:/ /ीशसळींशी.ारहळवल.लीं.ळप* प्रक्षेपित करण्यात आले असून, अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख *६ फेब्रुवारी २०२५* सायंकाळी ६ वाजेपर्यंत आहे.

*योजनेचा उद्देश:*

- दिव्यांग व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
- आर्थिक व सामाजिक पुनर्वसनाला गती देणे.
- दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कुटुंबासोबत स्वाभिमानाने जीवन जगण्यास सक्षम करणे.




जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्तींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, भंडारा विभागाने केले आहे.

# श्रीमती नरसम्मा महाविद्यालयात 'सोलर वेस्ट मॅनेजमेंट' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय सेमिनार संपन्न

**अमरावती | प्रतिनिधी**

स्थानिक श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किरण नगर, अमरावती येथे इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च या राष्ट्रीय संस्थेद्वारा पुरस्कृत- ' सोलर वेस्ट मॅनेजमेंट अँड इट्स सेल्फ सस्टेनेबल' या विषयावरील मंजूर प्रकल्पाचा एक अनिवार्य भाग म्हणून आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय सेमिनार आयोजित करण्यात आला होता. उद्घाटकीय समारंभात विचारपीठावर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ अरविंद बारहाते हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. तसेच प्रफुल्ल तायडे, विभागीय जनरल मॅनेजर, महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था, अमित अरोकार, मॅनेजिंग डायरेक्टर इंडिया एनर्जी अमरावती, डॉ. रवींद्र कडू , व्यवस्थापक मंडळ सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर भोंदू हे उपस्थित होते. या मेजर शोध प्रकल्पाचे प्रमुख डॉ. दिनेश सातंगे, संगणक शास्त्र विभाग यांनी खउडङ्ठ द्वारा मिळालेल्या या प्रकल्पाचा सविस्तर प्रवास व इतिहास सांगितला. या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित केले. शिवाय त्यांना या प्रकल्पात ज्यांचे सहाय्य झाले त्यांच्याविषयी विशेष




कृतज्ञता व्यक्त करून हा विषय समाजासाठी कसा महत्त्वाचा आहे याविषयी माहिती सांगितली. व खउडङ्ठ चे सहाय्यक प्रकल्प शोधकर्त्यांचे आभार मानले. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सुदृढ समाजासाठी वर्तमानकालीन विकासाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करणे कसे आवश्यक आहे व ते कसे गरजेचे आहे उच्च शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या मनुष्यबळाच्या आधारे या समस्यांचे निराकरण केले जाऊ शकते व त्यासाठी समाज समाजातील प्रत्येक घटकांनी सतर्कता बाळगली पाहिजे असे आवाहन केले

प्रफुल्ल तायडे यांनी येत्या पंधरा-वीस वर्षात सोलर वेस्ट किती असणार आहे व त्याचे समाजावर व पर्यावरणावर काय परिणाम होईल याविषयी विस्ताराने आकडेवारी देत या समस्येचे महत्त्व अधोरेखित केले. अमित अरोकार, यांनी सोलर प्लेट व त्यातील घटकाचे वर्गीकरण करून त्याची विविध विभागात उपयोगिता कशी वाढवता येईल हे उदाहरणासह समजून सांगितले. डॉ. रवींद्र कडू यांनी सोलर प्रकल्पातून भविष्यात निर्माण होऊ घातलेल्या विविध समस्या व त्याचे व्यवस्थापन याविषयी संभाव्य प्रकल्पबाबत आपण अवगत असावे असे भाष्य केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थाध्यक्ष चंद्रशेखर बंधू हे होते. त्यांनी पारंपारिक भारतीय समाजात अध्यात्मिक विचारधारेला अनुसरून निर्मिती आणि निर्माल्य या गोष्टींमधले तारतम्य व अनुबंध पटवून दिला. या सेमिनारच्या दुसऱ्या सत्रात शोधनिबंधांचे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये सुरज गावंडे, डायरेक्टर प्रीती मोरे, अमरावती, डॉ. बेबी कांबळे, अहिल्यानगर यांनी सेमिनारच्या विषयाला सुसंगत महत्त्वपूर्ण असे शोधनिबंध सादर करून या विषयाचे महत्त्व पटवून दिले. सेमिनारच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे विश्वस्त श्रीकांत काळीकर हे होते. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ.महेंद्र ढोरे, मा. प्र-कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. रविकांत कोल्हे, संचालक, गॅस अथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड गव्हर्मेंट ऑफ इंडिया हे उपस्थित होते. डॉ. महेंद्र ढोरे यांनी या एकदिवसीय परिसंवादाच्या अनुषंगाने झालेल्या चिंतन, मंथन सादरीकरणावर उचित असे भाष्य केले व सुदृढ समाज स्वास्थ्यासाठी निर्माण होणाऱ्या विकासाच्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या समस्यांचे निराकरण केले जाऊ शकते त्यासाठी अशा परिसंवादाची आवश्यकता आहे, असे मत व्यक्त केले. या परिसंवादात एकूण ३५ तज्ज्ञ संशोधकांचे शोधनिबंध महाविद्यालयाला प्राप्त झाले होते. त्यातील काही निवडक शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात आले. या परिसंवादाच्या आयोजनाच्या प्रमुख भूमिकेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाट तसेच नेहरू महाविद्यालय नेर परसोपंत येथील प्राचार्य डॉ. अशोक भोरजार व डॉ. युवराज खोळसकर, सोशल वर्क महाविद्यालय बडनेरा, डॉ तक्षशिला मोटघरे, महात्मा ज्योतिबा फुले, महाविद्यालय यवतमाळ, इजि. मनोज मालवे, अहिल्यानगर, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. नरेंद्र जाठे, प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर सावरकर हे होते. दिवसभर विविध सत्रात संगणकशास्त्र विभागातील इतर प्राध्यापक मंडळी व पदव्युत्तर संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व सेमिनार सहभागी प्राध्यापक मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे संचालन डॉ. पंकज वानखेडे व आभार डॉ. खोडस्कर यांनी मानले.

## तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहामध्ये संपन्न



**पारनेर | प्रतिनिधी**

भारत सरकारचे नेहरू युवा केंद्र अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाणे व जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला यांच्या मार्गदर्शनाने क्रीडा स्पर्धा सम्पन्न झाल्या.

यामध्ये १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

या स्पर्धांमध्ये. १०० मीटर धावणे. (मुले आणि मुली ) , गोळा फेक (मुले आणि मुली ) व खो खो मुली इ. स्पर्धा अत्यंत उत्साहात व आनंदमयी वातावरणात पार पडल्याया मध्ये घेण्यात आलेल्या १०० मी.धावणे स्पर्धेत मुलांमध्ये अनुक्रमे प्रथम क्रमांक पवार गणेश , द्वितीय क्रमांक सुजित बोरुडे व तृतीय क्रमांक शहाजी चत्तर या विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळवली , १०० मी.धावणे मुलीमध्ये प्रथम क्रमांक चौधरी वैष्णवी , द्वितीय क्रमांक घोलप प्रतिक्षा व तृतीय क्रमांक पोटे मोनिका , यांनी मिळवीले

तर गोळा फेक मुलांमध्ये अनुक्रमे प्रथम क्रमांक वैष्णव चौधरी , द्वितीय क्रमांक प्रशांत महांडुळे , व तृतीय क्रमांक दत्तात्रय लोंढे या विद्यार्थ्यांनी मिळवला.आगामी होणाऱ्या जिल्हा पातळीवरील क्रीडा स्पर्धामध्ये वरील सर्व विद्यार्थ्यांची निवड झाली .यावेळी 'पंच म्हनुन माजी सैनिक दिवटे मेजर व शिर्के मेजर यांचे मोलाचे सदकार्य लाभले .यावेळी , रवी ठाणगे , आदेश कावरे , सुमित गायकवाड़, वैष्णव चौधरी , गणेश पावर , राहुल चौगुले, नितिन फाड़, सिद्धार्थ कळसकर , भावेश रेपाळे, शाहजी चतर, हार्दिक रेपाळे इ. सहभागी झाले होते.

**तालुकास्तरीय क्रिडास्पर्धा पार पाडन्यामध्ये मध्ये क्रीडा समितीचे मोलाचे योगदान लाभले.**
**आगामी होणाऱ्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये निवड झालेले सर्व विद्यार्थी जिल्ह्यातही पारनेर तालुक्याचे नावलौकिक करतील .**
**सागर हिंगडे(सामाजिक कार्यकर्ते)**

## नाट्य संमेलन युवा नाट्य कलकारांसाठी विश्वास व दिशा देणारे ठरेल-आ.संग्राम जगताप


### १०० वे अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलनासाठी रंगमंच उभारणीला सुरुवात



**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

१०० वे विभागीय अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या तयारीचा शुभारंभ झाला असून, सारडा महाविद्यालय येथे रंगमंच उभारणीच्या कामाला सुरुवात झाली असून संमेलनाचे निमंत्रक आमदार संग्राम जगताप, स्वागताध्यक्ष डॉ.बापूसाहेब कांडेकर, तसेच राजाभाऊ अमरापूरकर, सुमतीलाल कोठारी, प्रसाद बेडेकर, क्षितिज झावरे, प्राचार्या माहेश्वरी गावित, मोहिनीराज गटणे, पी.डी. कुलकर्णी, चैत्राली जावळे, शशिकांत नजन, अभय गोले, अमोल खोले, वैभव कुऱ्हाडे, चंद्रकांत सेंदाने, आयुब खान, संतोष ताठे , इम्रान शेख , प्रशांत जठार सागर म्हेत्रे, जालिंदर शिंदे, कल्पना सावंत, अय्युब खान, मुकुंद संत, शिरीष जोशी, डॉ. शिंदे, चंद्रकांत जाधव यांच्यासह अनेक मान्यवर नाट्यकर्मी उपस्थित होते.

## गांधी सिटी पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक समारंभ उत्साहात संपन्न



**पुलगाव | प्रतिनिधी**

पुलगाव येथील गांधी सिटी पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक समारंभ साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे सचिव सचिन अग्निहोत्री आणि पुलगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार राहुल सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि स्वागत गीताने झाली. शाळेचे मुख्याध्यापक धनंजय शिंगनगुडे यांनी शाळेच्या कामगिरीचा आढावा सादर केला. दहावीच्या सीबीएसई परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या श्रावणी नितीन ढोबळे हिचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात विविध नृत्य आणि सादरीकरणांद्वारे सामाजिक आणि सांस्कृतिक संदेश देण्यात आले. शेतकऱ्यांच्या समस्या, आई सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित सादरीकरण, गोरा कुंभार आणि वीर तानाजी मालुसरे यांच्या जीवनावर आधारित नृत्य यांचा समावेश होता.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. शाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## रेल्वे क्रॉसिंग टी पॉईंट जवळ ट्रक उलटला; जीवितहानी नाही




**पुलगाव | प्रतिनिधी**

पुलगाव-औरंगाबाद-नागपूर हायवेवर गुरुवारी रात्री दोन वाजता पुलगाव कॅम्प रोड रेल्वे क्रॉसिंग टी पॉईंटवर एक कांद्याने भरलेला ट्रक उलटला. ही घटना ट्रकच्या ब्रेक फेल होण्यामुळे घडल्याचे चालक गोरख जाधव यांनी सांगितले.

चक्र२ झट ६१०२ क्रमांकाच्या ट्रकमध्ये अहमदनगरवरून छत्तीसगडच्या रायपूरकडे २५ टन कांद्याच्या अंदाजे ५०० कट्ट्यांचे लोड होते. रात्री दोन वाजता ट्रक पुलगाव कॅम्प रोडवरील रेल्वे क्रॉसिंग टी पॉईंटजवळ ब्रेक फेल होऊन रस्त्यावरील २० फुट खाली मैदानावर उलटला.

चालक गोरख जाधव आणि हेल्पर नाना शिंदे हे सकाळी अहमदनगरवरून रायपूरसाठी निघाले होते. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. पुढील तपास पुलगाव पोलिस करत आहेत.

## दिल्ली येथील मनु मावीचा सह्याद्री जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

**गंगापूर | प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लासूर येथे होणाऱ्या सह्याद्री जीवनगौरव पुरस्कार समारंभात दिल्लीतील आंतरराष्ट्रीय थलिट मनु मावी हिचा सन्मान करण्यात येणार आहे. ८०० मीटर धावपटू म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल आणि तिच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा पुरस्कार देण्यात येत आहे.

हा पुरस्कार ९ फेब्रुवारी रोजी लासूर येथे पत्रकारांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. मनु



मावीची ही कामगिरी जिल्ह्यासह संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

## पुलगाव येथील मनोहरराव भोजने यांचे निधन

**पुलगाव | प्रतिनिधी**

पुलगाव (मीरा कॉलनी) स्थानिक रहिवासी मनोहरराव भोजने वय ८६ वर्ष यांचे वृद्धापकाळाने



निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण कुटुंब शोकसागरात बुडाले आहे. त्यांचे मागे मुली, मुलगा, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

त्यांचे पार्थिव २६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी तीन वाजता त्यांच्या मूळ गावी, राजना, पूर्णा जिल्हा अमरावती येथे अंत्यसंस्कारासाठी नेले जाईल.

इंडियन मिलिटरी स्कूलचे प्राचार्य रविकिरण भोजने यांचे ते वडील होते. त्यांच्या निधनामुळे कुटुंब आणि समाजात मोठा शोक व्यक्त केला जात आहे.

त्यांच्या आत्म्याला शांती लाभो, अशी सदिच्छा व्यक्त केली जात आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेलगाव(क)शाळेमध्ये आनंदी बाजार उत्साहात संपन्न



**सोलापूर | प्रतिनिधी**

बुधवार दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेलगाव (क) येथे बाल आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले. या बाल आनंदी बाजाराचे उद्घाटन पंचायत समिती करमाळाचे शिक्षण विस्तार अधिकारी मिनीनाथ टकले साहेब व देवळाली केंद्राचे केंद्रप्रमुख राजकुमार खाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल वीर, उपाध्यक्ष गणेश दास, ग्रामपंचायत सदस्य तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. सदर बाजाराला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह व आनंद ओसंडून वाहत असल्याचे दिसून येत होते.सदर कार्यक्रमाचे नियोजन सहशिक्षक अनिल नरसाळे व शाळेचे मुख्याध्यापक बलभीम बनसोडे यांनी केले.

## रामनवमी सुवर्ण महोत्सवी शोभायात्रा नामफलकाचे उत्साहात विमोचन

**नागपूर | प्रतिनिधी**

पश्चिम नागपूर नागरिक संघ, रामनगर तर्फे दरवर्षीप्रमाणे रामनवमीच्या निमित्ताने प्रभू श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा काढण्यात येते. यंदा या शोभायात्रेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून, या निमित्ताने रामनवमी शोभायात्रेच्या तयारीला प्रारंभ झाला आहे.




आज, २५ जानेवारी २०२५ रोजी रामनगर येथील श्रीराम मंदिरात सुवर्ण महोत्सवी शोभायात्रेच्या नामफलकाचे उत्साहात विमोचन करण्यात आले. हा सोहळा ॲड. आनंद परचुरे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची रंगत वाढली. रवीजी वाघमारे यांनी योगाचार्य रामभाऊ खांडवे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. योगाचार्य खांडवे यांनी प्रभू श्रीरामचंद्राच्या आदर्शांचे स्मरण करून समाजात चारित्र्य व संस्कार रुजवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदिराच्या विश्वस्त वृषाली शिलेदार यांनी प्रभावीपणे केले. सचिव राजीव काळेले यांनी तन, मन, धन अर्पण करणाऱ्या सर्व भक्तांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता प्रसाद वितरणाने करण्यात आली.

पश्चिम नागपूर नागरिक संघातर्फे ६ एप्रिल २०२५ रोजी रामनवमीच्या दिवशी सुवर्ण महोत्सवी शोभायात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह असून, भव्य शोभायात्रेची जय्यत तयारी सुरू आहे

## मूल येथे शालेय बसेस सुरू करण्यासाठी विद्यार्थ्यांचे बस रोको आंदोलन यशस्वी

**मूल | प्रतिनिधी**

नवभारत कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी मूल येथे शालेय वेळेत बसेस सुरू करण्याच्या मागणीसाठी बस रोको आंदोलन केले. दोन तास चाललेल्या या आंदोलनानंतर, परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य केल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.

मूल तालुक्यातील सकाळच्या पाळीतील विद्यार्थ्यांसाठी शालेय बसेस वेळेत उपलब्ध नसल्याने शैक्षणिक नुकसान आणि मानसिक तणाव सहन करावा लागत आहे. या समस्येवर प्रशासनाने वारंवार दुर्लक्ष केल्यामुळे, मूल सोशल फोरमने नवभारत कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींसह बसस्थानकावर गेटजवळ ठिय्या आंदोलन केले.

या आंदोलनामुळे प्रशासनामध्ये खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनीही विद्यार्थिनींच्या आंदोलनाला जोरदार पाठिंबा दिला. अखेर,




चंद्रपूर आगार व्यवस्थापक अंकुश खाडीलकर, वाहतूक निरीक्षक कामतवार, गडचिरोलीचे वाहतूक अधीक्षक रामटेके आणि चंद्रपूरचे वाहतूक निरीक्षक पिसे आंदोलनस्थळी दाखल झाले.

मूल सोशल फोरमचे विजय सिद्धावर आणि नवभारत कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अल्का वरगंटीवार यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर प्रशासनाने सोमवारपासून शालेय वेळेत बसेस सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले.


मूल पोलिसांनी आंदोलनस्थळी चोख बंदोबस्त ठेवला होता, त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. विद्यार्थिनींच्या ठाम भूमिकेमुळे आणि नागरिकांच्या पाठिंब्यामुळे हे आंदोलन यशस्वी ठरले.


# प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



















## खडकपाडा परिसरात फर्निचरच्या गोदामाला आग

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील पश्चिम उपनगरात असलेल्या मालाड मध्ये शनिवारी सकाळी भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. मालाड - दिंडोशी दरम्यान असणाऱ्या खडकपाडा परिसरात फर्निचरच्या गोदामाला ही आग लागली आहे. या गोदामामध्ये चित्रपटासाठी लागणारे साहित्य असल्याचे सांगण्यात येत आहे. या गोदामामध्ये पूर्ण लाकडी सामान असल्यामुळे आग झपाट्याने पसरली आहे. ही आगा नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. तसेच कुठलीही जीवित हानी झाल्याचे वृत्त देखील नाही.

सुरुवातीला एका गोदामाला लागलेली आहे आजूबाजूला पसरत गेली आणि आता या आगीने भीषण रूप धारण केले आहे. ही आग वेगाने पसरत असून त्यामुळे आकाशात काळ्या रंगाचे धुक्याचे प्रचंड लोट पाहायला मिळत आहेत.

### मराठा आरक्षणावर एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केली भूमिका

## १० टक्के आरक्षण कायम राहणार असल्याचा दावा; महाविकास आघाडीवर आरोप

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र राज्य आता 'इंडस्ट्री फ्रेंडली स्टेट' झाले आहे. त्यामुळे विरोधकांच्या पोटात दुखत आहे. त्यांना हे आवडत नसल्यानेच ते सरकारवर टीका करत आहेत. मात्र विरोधकांना प्रत्युत्तर न देता आमच्या कामातूनच उत्तर देणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर शिंदे यांनी कोल्हापूर येथे अंबाबाई महालक्ष्मीचे दर्शन घेतले. जनतेने मोठ्या प्रमाणात महायुतीला विजय मिळवून दिला आहे. त्यामुळेच आभार मानण्यासाठी मी आलो असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर देखील त्यांनी भूमिका स्पष्ट केली. तर आरक्षणाविरोधात महाविकास आघाडीतील लोक न्यायालयात गेले असल्याचा आरोपही शिंदे यांनी केला आहे.

या वेळी माध्यमांशी बोलताना शिंदे म्हणाले की, दावोस मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योग मंत्री उदय सामंत या दोघांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी अतिशय विक्रमी करारनामे झालेले आहेत. १५ लाख कोटींपेक्षा जास्त रुपयांचे करार झाले आहेत. यामध्ये लाखो लोकांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे चांगले झालेले विरोधकांना बघायला आवडत नाही. मी जेव्हा दावोसला गेलो होतो, त्यावेळी देखील साडेसात लाख कोटींची करार झाले होते. त्याची अंमलबजावणी देखील ७० ते ८० टक्के झाली आहे. यापूर्वी करारनामे कसे होत आणि त्याची अंमलबजावणी कशी होत होती, हे तुम्हाला माहिती आहे. मात्र महायुतीच्या काळात मोठ्या प्रमाणात परदेशी गुंतवणूक आली आहे.



देशातील एकूण परदेशी गुंतवणुकीपैकी ५२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र आता 'इंडस्ट्री फ्रेंडली स्टेट' झाले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्राकडे उद्योग आकर्षित होत आहेत. लोकांना काम मिळत आहे. यामुळे विरोधक टीका करतात. मात्र त्यांना उत्तर देणार नाही तर आम्ही कामाने उत्तर देणार असल्याचेही शिंदे यांनी म्हटले आहे.

मराठा समाजाच्या बाबतीमध्ये सरकारची भूमिका होती ती आजही आहे आणि उद्याही राहील. महायुतीच्या काळामध्ये मराठा समाजासाठी बऱ्याच योजना आम्ही सुरू केल्या आहेत. ओबीसी किंवा इतर कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी न करता विशेष अधिवेशन घेऊन मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिले आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना देखील त्यांनी आरक्षणाचा निर्णय घेतला होता. मी मुख्यमंत्री असताना देखील देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार आम्ही सर्वांनी मिळून मराठा समाजाला आरक्षण दिले होते. मात्र आम्ही दिलेले आरक्षण महा विकास आघाडी सरकारच्या काळात टिकले नाही, हे त्यांचे दुर्दैव आहे. आम्ही कायम मराठा समाजासोबत आहोत. त्यांच्या ज्या योजना आहेत त्या कायम सुरू राहतील. मराठा समाजातील दहा टक्के आरक्षण रद्द करावे यासाठी महा विकास आघाडीतील काही लोक न्यायालयात गेले आहेत. मात्र हे आरक्षण टिकले पाहिजे, ही आमची भूमिका ठाम आहे. मात्र मराठा समाजाला आरक्षण देताना इतर कोणत्याही समाजावर अन्याय होता कामा नये, ही आमची भूमिका असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

## दिव्या नरड हिने ब्लॅक बेल्ट परीक्षा उत्तीर्ण करत कराटेमध्ये आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला

**मूल । प्रतिनिधी**

जून्सेई शोतोकान कराटे असोसिएशन ऑफ इंडिया या राष्ट्रीय कराटे संघटनेशी संलग्न कराटे अँड फिटनेस क्लब, मूल येथे नुकतीच कराटे बेल्ट परीक्षा पार पडली. परीक्षक म्हणून जे.एस.के.ए. इंडिया चे राष्ट्रीय प्रमुख शिहान विनय बोधे आणि सेन्सई रवींद्र मुक्के उपस्थित होते. या परीक्षेत एकूण ५३ कराटेपटूंनी सहभाग घेतला. त्यामध्ये क्लबची राज्यस्तरीय खेळाडू दिव्या नरड हिने ब्लॅक बेल्टची परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे.



करटेमधील प्रशिक्षणात बेल्टनुसार प्रगती ठरवली जाते. ब्लॅक बेल्ट हा नवव्या क्रमांकाचा टप्पा असून तो गाठण्यासाठी पाच ते सहा वर्षांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि कठोर मेहनत आवश्यक असते. दिव्याने सहाव्या वर्गापासून कराटे अँड फिटनेस क्लब, मूल येथे प्रशिक्षक इम्रान खान आणि निलेश गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतले आहे.

दिव्याने प्रशिक्षणादरम्यान अनेक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिने चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स या मेगा इव्हेंट्समध्ये यश मिळवले आहे, तसेच २०२३ मध्ये राज्यस्तरीय शालेय कराटे स्पर्धेत रौप्यपदक मिळवत तालुक्याचा गौरव वाढवला आहे. सध्या ती नागपूर येथे शिक्षण घेत आहे. ब्लॅक बेल्टची परीक्षा उत्तीर्ण केल्यामुळे जून्सेई शोतोकान कराटे असोसिएशन ऑफ इंडिया चे राष्ट्रीय प्रमुख विनय बोधे, प्रशिक्षक इम्रान खान, निलेश गेडाम, तसेच तिच्या पालकांनी तिचे कौतुक केले आहे. मूल शहरवासीयांनीही तिचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मशिदीवरील लाऊडस्पिकर बाबत मुंबई हायकोर्टाचा ऐतिहासिक निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात आजान आणि भोंग्याचा मुद्दा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उचलून धरला होता आणि भोंगे नाही उतरवले तर प्रत्येक मशिदी समोर मोठ्या आवाजात हनुमान चालीसा लावा असा आदेश मन सैनिकांना दिला होता.

आज याच विषयावर मुंबई उच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय दिला आहे. मशिदीवरील लाऊडस्पिकरबाबत मुंबई हायकोर्टाचा मोठा निकाल दिला आहे. आवाजाविरोधात तक्रार आल्यास पोलिसांनी दखल घ्यावी, असं न्यायालयाने म्हटले आहे. पहिल्यांदा



समज द्या, दुसऱ्यांदा उल्लंघन केल्यास स्पीकर जप्त करावा, अशा सूचना मुंबई उच्च न्यायालयाने दिल्या आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांमध्ये सातत्याने राजकीयदृष्ट्या संवेदनशील बनला होता, अखेर उच्च न्यायालयाने देखील यावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .